# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यातील कानगाव येथे वृध्द शेतकऱ्यांचे राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये पिरॅमीड हॉस्पीटल दौंड यांनी फसवणुक केल्याची तक्रार

**(१) ६३१४ (०७-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यातील कानगाव येथे वृध्द शेतकऱ्यांचे राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये पिरॅमीड हॉस्पीटल दौंड यांनी फसवणुक केल्याची तक्रार जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी दाखल केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये पुणे जिल्हयातील अनेक नामांकित रुग्णालयांनी सहभाग न घेता अलिप्त राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्हयातील राजीव गांधी जीवनदायी योजनेत समाविष्ट असलेल्या रुग्णालयांकडून देखील रुग्णांची अडवणूक केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये पुणे जिल्हयातील रुबि हॉल क्लिनीक, जहांगीर हॉस्पिटल, संचेती हॉस्पिटल, मंगेशकर हॉस्पिटल व बुधराणी हॉस्पिटल या हॉस्पिटलचा समावेश होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०१-२०१९)** :(१) होय, सदर तक्रार दिनांक १७.११.२०१४ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर केली आहे.

(२) अंशतः खरे आहे.

राजीव जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट होण्यासाठी पुण्यातील रुबि हॉल क्लिनिक, जहांगीर हॉस्पीटल, संचेती हॉस्पीटल, मंगेशकर हॉस्पीटल व बुधराणी हॉस्पीटल या रुग्णालयांनी ऑनलाई अर्ज सादर केलेले नाहीत.

(३) नाही.

(४) पुणे जिल्हयामध्ये योजना सुरु होण्याआधी सर्व रुग्णालयांची बैठक घेऊन त्यांना योजनेसंदर्भात व अंगीकरणांची प्रक्रिया याबाबत माहिती देण्यात आली होती. सदर योजनेमध्ये

सहभागी होणे ही रुग्णालयाची ऐच्छिक बाब आहे. ज्या रुग्णालयांना योजनेंतर्गत सहभागी व्हावयाचे आहे त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर रुग्णालयाची तपासणी होऊन त्यास अंगीकृत करण्याचा निर्णय झाल्यास रुग्णालय व विमा कंपनी यांच्यामध्ये करार करण्यात येतो. त्यामुळे योजनेमध्ये सहभागी होण्यास रुग्णालयावर सक्ती करता येत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(२) ८०१६ (०८-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात मोठ्या प्रमाणात सोयी - सुविधांचा अभाव असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे मसुरे (जि.सिंधुदुर्ग) येथील तरुणांचा रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळेच मृत्यू झाल्याची घटना घडली होती, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जिल्हा रुग्णालयाच्या रुग्णवाहिका बंदावस्थेत असून शववाहिका नाही, डायलेसिस सेंटर बंद पडलेले आहे, सीटीस्कॅन मशिन बंद आहे, तसेच डॉक्टरांकडून रुग्णांकडे पैशाची होत असलेली मागणी, रुग्णांना अपमानास्पद वागणूक देणे आदि प्रकार सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास,तद्नुसार उक्त रुग्णालयात तात्काळ सोयी सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासरनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची विलंबाची काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०१-२०१९) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. मौजे मसुरे (जि.सिंधुदूर्ग) येथील दि.३१.१२.२०१४ रोजी सर्पदंश झालेला रुग्ण जिल्हा रुग्णालयात दाखल होतेवेळीच त्याची प्रकृती चिंताजनक होती. दाखल झाल्यानंतर सदर रुग्णावर सर्व प्रकारचे तातडीचे उपचार योग्य प्रकारे व वेळेवर करण्यात आले. तथापि, सर्पदंश अतिविषारी प्रकारातील असल्याने सदर रुग्णाचा दि.१.०१.२०१५ रोजी सकाळी ११.४० वा मृत्यू झाला आहे.

(३) हे खरे नाही. जिल्हा रुग्णालय सिंधुदूर्ग येथील ४ रुग्णवाहिका चालू असून नवीन शववाहिकेची मागणी करण्यात आली आहे. येथील उपलब्ध ६ डायलेसीस यंत्र कार्यान्वित असून सी.टी.स्कॅन मशिनचे आयुर्मान संपल्याने सद्यस्थितीत गरजेनुसार खाजगी सेंटरद्वारा सी.टी.स्कॅन चाचण्या करुन घेण्यात येतात. रुग्णालयात रुग्णांना कोणत्याही प्रकारे अपमानास्पद वागणूक देण्यात येत नाही तसेच पैशाची मागणी करण्यात येत नाही.

(४), (५), व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अप्पर वैतरणा धरणातील पाण्याचा राखीव साठा दुष्काळी भागातील ग्रामीण जनतेला देण्याबाबत**

**(३) ६१६८५ (०२-०८-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या अप्पर वैतरणा धरणातील पाण्याचा राखीव साठा दुष्काळी भागातील ग्रामीण जनतेला देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे या वर्षीही मान्सून वेळेत न आल्यास मुंबईमध्ये पाणी टंचाई निर्माण होवू शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेने एक पत्र जलसंधारण विभागाकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पत्रावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०२-२०१९) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) यांचे पत्र क्र.AMC/P/२५१, दि. ०६/०५/२०१६ अन्वये मा. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांना उर्ध्व वैतरणा धरणाच्या निभावणी साठयातून ५०% पाणी, पाऊस येईपर्यंत मुंबई शहराचा पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने सोडण्यात यावे अशी विनंती करण्यात आली होती.

(४) प्रश्न मुंबई महानगरपालिकेच्या मागणीनुसार उर्ध्व वैतरणा धरणातून दि.१७/०६/२०१६ ते दि.०४/०७/२०१६ पर्यंत १८.४६४ द.ल.घ.मी. इतके म्हणजेच निभावणी साठयाच्या १७.९२% पाणी सोडण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांकरिता वन (संवर्धन) अधिनियम शिथिल करण्याबाबत**

**(४) ६१८७८ (२५-०८-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महामंडळाचे पत्र क्र.४६५१/ विपाविम/कांता.२ (११/०८) दि .१५/१०/२००८ नुसार गडचिरोली जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांकरिता वन (संवर्धन)अधिनियम शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाने मा.राज्यपाल यांना असलेल्या अधिकारांचे (Shedul ५ Of

Constitution Of India ) अनुषंगाने तुलतुली व कारवाफा प्रकल्पाकरिता सदर प्रस्ताव सादर करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या एकूण सिंचन क्षमता २,११,१९० हे. क्षेत्रापैकी केवळ ७२,३३१ हे.सिंचन क्षमता असून सन १९८० च्या वन अधिनियमात शिथिलता मिळाल्यास अतिरिक्त ४९,३९७ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल व त्याचा शेतकरी ,मजूर आदिवासी व गैरआदिवासी इत्यादींना मोठ्या प्रमाणावर लाभ मिळेल,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा. राज्यपाल यांना याबाबत अनेक पत्रे दिलेली असूनही आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,गडचिरोली जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांकरिता वन (संवर्धन) अधिनियम १९८० शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०२-२०१९) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय,अंशत: खरे आहे. जिल्ह्याची एकूण सिंचन क्षमता १०२७९८ हे.असून जुन २०१५ अखेर ३२८९५ हे.सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.वन अधिनियमात शिथीलता/सुट मिळाल्यास ९ प्रकल्पातुन ५८८२८ हे.सिंचन क्षमता निर्माण होऊ शकेल.

(४) व (५) वन (संवर्धन) अधिनियम १९८० शिथिल करण्याबाबतची बाब केंद्र शासनाशी संबंधित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य शिक्षण मंडळाने जाहिर केलेल्या संचमान्यता यादीत शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याचे दाखविलेबाबत

**(५) ६५१७२ (२७-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी संस्थांच्या, माध्यमिक शाळांच्या सन २०१५-१६ या वर्षातील राज्य शिक्षण मंडळाने जाहिर केलेल्या संचमान्यता यादीत मुंबईतील तीन विभागासह राज्यातील सर्व जिल्ह्यातील शाळांमध्ये ५ हजार ४८६ शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याचे दाखविण्यात आले असून त्या तुलनेत ४ हजार २२९ शिक्षक हे राज्यभरातील विविध शाळांमधून अतिरिक्त ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात सुमारे ३० हजार शिक्षकांची गरज असताना शिक्षण विभागाने केलेल्या संचमान्यतेनुसार राज्यातील शेकडो शाळांमध्ये केवळ १ हजार २५७ शिक्षकांचीच पदे रिक्त असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयाने राज्य शासनने संच मान्यतेचे निकष निश्चित केले असतांनाही निकषानुसार अनेक शाळेतील शिक्षक पदे मंजूर करण्यात आलेली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून, संच मान्यतेत अनेक त्रुटी असल्याबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाच्या वतीने वेळोवेळी शिक्षण संचालकांच्या निदर्शनास आणूनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शिक्षण मंडळ व शिक्षण विभागाच्या माहितीमध्ये विरोधाभास असण्याची कारणे काय आहेत तसेच उपरोक्त प्रकरणी अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) : (**१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. वेळोवेळी संच मान्यता दुरुस्तीबाबत शिबीरांचे आयोजन करुन संच मान्यता दुरुस्त करुन देण्यात आलेल्या आहेत.

(४) अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकण विकासाच्या योजना मार्गी लावण्यासाठी समन्वयक म्हणून सनदी अधिका-यांची नियुक्ती करण्याबाबत

**(६) ८५४१८ (२४-०८-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विकासासंदर्भात जाहीर करण्यात आलेल्या सर्व योजना मार्गी लावण्यासाठी समन्वयक म्हणून सनदी अधिकारी नियुक्त करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल,२०१६ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही समन्वयक म्हणून सनदी अधिका-यांची नियुक्त करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विकास योजनांसाठी समन्वयक म्हणून सनदी अधिका-यांची नियुक्त करण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) कोकण विभागाच्या विकासासंदर्भात एप्रिल, २०१६ मध्ये जाहीर करण्यात आलेले पर्यटन, दळणवळण, कृषी, फलोत्पादन, पर्यावरण, मत्स्यव्यवसाय विकासाशा संबंधित

विविध कार्यक्रम / योजना / कामे ही अनेक मंत्रालयीन विभागांशी संबंधित आहेत. त्यापैकी काही कार्यक्रम / योजना / कामे पूर्ण होऊन त्याचा अहवाल संबंधित मंत्रालयीन विभागांकडून संसदीय कार्य विभागास सादर करण्यात आलेला आहे.

मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव हे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी असतात. तसेच त्यांच्या अधिनस्त असलेले क्षेत्रिय स्तरावरील महासंचालक / व्यवस्थापकीय संचालक / आयुक्त इत्यादी अधिकारी देखील आय.ए.एस. दर्जाचे असतात. त्यांच्या स्तरावरुन विकासासंदर्भात विविध योजनांना गती मिळावी व त्या मार्गी लागाव्यात या दृष्टीकोनातून वेळोवेळी आढावा घेण्यात येत असतो.

कोकण विकासासंदर्भात जाहीर करण्यात आलेले विविध कार्यक्रम / योजना / कामे यांची व्यापकता विचारात घेता तसेच त्याची जलद गतीने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सदर कामासंदर्भात करावयाचा समन्वय / संनियंत्रण करण्यासाठी केवळ एका सनदी अधिकाऱ्याची नेमणूक ही पूरेशी ठरेल असे वाटत नाही. त्यामुळे सदर योजना / कार्यक्रम व कामांना गती देण्याच्या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्यांच्या अंमलबजावणीत सुसूत्रता आणण्याचे व त्याचे संनियंत्रण करण्याचे अधिकार मुंबई व मुंबई उपनगर या जिल्हांच्या संदर्भात “संबंधित जिल्हयाचे पालक सचिव” यांना आणि कोकणातील इतर जिल्हयांच्या संदर्भात “विभागीय आयुक्त, कोकण विभाग” यांना सूपूर्द करण्यात आले आहेत.

---

**पालघर जिल्हयातील अनेक भागात पेसा कायद्याची अंमलबजावणी करताना अयोग्य प्रकल्प राबवित असल्याबाबत**

**(७) ८८९४६ (२२-०८-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील अनेक भागात पेसा कायद्याची अंमलबजावणी करताना अयोग्य प्रकल्प राबवित असून अनेक ग्रामसभांचा सल्ला न घेता भूसंपादनाचा निर्णय घेत असल्यामुळे नागरिकांनी दिनांक २९ मे, २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,उक्त मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदर मागण्या मान्य करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) मोर्चेकऱ्यांच्या मागण्यांचे स्वरुप थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

१. पेसा गावे जाहीर करणे.
२. ग्रामसभेच्या संम्मतीशिवाय कोणताही प्रकल्प लादला जाऊ नये.
३. जमीनींच्या योग्य नोंदी व देखभाल.
४. वनहक्क कायद्याअंतर्गत प्रलंबित दावे व अपिल मान्य करणेबाबत.
५. मनरेगा अंतर्गत मजुरांना मजुरी-बेकारभत्याची रक्कम अदा करणे.
६. जिल्ह्यात प्रत्येक घरी शौचालय बांधून पाण्याचे दुर्मिक्ष दुर करणे.

उक्त मागण्यांसदर्भाने जिल्हाधिकारी,पालघर यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश दिले असून त्यानुसार जिल्हास्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेर नगरपंचायत अंतर्गत येणा-या अजंती (जि.यवतमाळ) गावात जिल्हा परिषद शाळेमध्ये मुलांना झेंडावंदनासाठी मज्जाव करण्यात आल्याबाबत**

**(८) ८९३५७ (२८-११-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेर नगरपंचायतीतंर्गत येणा-या अजंती (जि.यवतमाळ) गावात जिल्हा परिषद शाळेमध्ये मुलांना ते केवळ पारधी समाजाचे असल्यामुळे प्रजासत्ताकदिनी झालेल्या झेंडावंदनासाठी मज्जाव करण्यात आल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मुलांना झेंडावंदनासाठी मज्जाव करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२),(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांसाठी ग्रामविकास विभागाने सर्व समावेशक व स्वतंत्र धोरण आखल्याबाबत**

**(९) ९०२९६ (२२-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांसाठी ग्रामविकास विभागाने सर्व समावेशक आणि स्वतंत्र धोरण आखले असल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास

आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धोरणामध्ये प्रत्येक जिल्हयातील मुख्य कार्यकारी अधिकारी अवघड आणि सर्वसाधारण क्षेत्रच अद्याप निश्चीत करु शकले नाही, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीसाठी शासन निर्णय, दि.२४/४/२०१७ अन्वये व जिल्हांतर्गत बदलीसाठी शासन निर्णय दि.२७/२/२०१७ अन्वये सुधारित धोरण विहीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**खानापूर (ता. खानापूर-विटा, जि. सांगली) पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय कार्यालयाच्या फर्निचरसाठी निधी मिळण्याबाबत**

**(१०) ९१५२६ (१२-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर पंचायत समितीची (ता. खानापूर-विटा जि. सांगली) नवीन इमारत तयार असून कार्यालयीन फर्निचरचा प्रस्ताव प्रलंबीत असल्याने सदरच्या इमारतीचा कार्यालयीन कामकाजासाठी उपयोग होत नसल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू फर्निचरच्या प्रस्तावास मंजूरी न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) खानापूर पंचायत समिती (जि. सांगली) प्रशासकीय इमारतीच्या ठिकाणी अंतर्गत फर्निचर सुविधेच्या कामास शा.नि. दिनांक २८ जून, २०१७ अन्वये रु. १५४.३४ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नंदुरबार जिल्ह्यातील जिल्हा परिषदेंतर्गत आरोग्य विभागातील कर्मचारी/अधिका-यांचे वेतन मिळण्यास होत असलेली दिरंगाई**

**(११) ९२२३४ (१२-०८-२०१७). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील जिल्हा परिषदेंतर्गत आरोग्य विभागातील कर्मचारी/अधिका-यांचे वेतन ४ ते ६ महिन्यानंतर मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,त्यानुसार कर्मचारी/अधिकाऱ्यांचे वेतन वेळत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :** (१) नाही.

आरोग्य विभागांतर्ग कर्मचाऱ्यांचे देय असलेल्या महिन्याचे वेतन दरमहा ७ तारखेच्या आत अदा करण्यात येते.

वैद्यकिय अधिकाऱ्यांचे वेतनाबाबतीत शासनाने दिलेल्या आदेशानुसार तालुका आरोग्य अधिकाऱ्यामार्फत प्रा.आ. केंद्र स्तरावरील वैद्यकिय अधिकारी यांचे बायोमेट्रीक/मॅन्युएल हजेरीपत्रक प्राप्त झाल्यानंतर सेवार्थ प्रणालीद्वारे देयके कोषागारामार्फत पारीत होतात.

(२), (३), व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुकाणा (ता.नेवासा, जि. अहमदनगर) येथील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता व रस्त्यावर विजेची सोय नसल्याबाबत**

**(१२) ९२६३२ (१२-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकाणा (ता.नेवासा, जि. अहमदनगर) येथील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तसेच या रस्त्यावर विजेची सोय नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता व वीजेची सोय करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :** (१) होय,हे खरे आहे.

(२) मौजे कुकाणा ता. नेवासा येथील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता या रस्त्याचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षात १२ वा वित्त आयोग या योजनेंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करण्यात आलेले

आहे.ग्रामपंचायत कुकाणा यांनी माहे जून २०१७ मध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाढलेल्या वेड्या बाभळी पुर्ण काढून रस्ता मोकळा केलेला आहे. तसेच,रस्त्याच्या दोन्ही बाजूस वीजेची सोय उपलब्ध करुन दिलेली असून त्यांची नियमित दुरुस्ती केली जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदे अंतर्गत प्राथमिक शिक्षकांची जागा रोस्टर अभावी रिक्त असल्याबाबत

**(१३) ९२६८० (२३-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक शिक्षकांची सुमारे ८०५ जागा रिक्त असल्याचे माहे जून मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंतरजिल्हा बदलीच्या प्रकीयेमुळे पहिल्या टप्प्यांमध्ये रोस्टर उशीरा झाल्याने शिक्षकांचा समावेश झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,शिक्षकांचा बदलीचा दुसरा टप्पा ग्रामविकास विभागाने राबवून तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांच्या रिक्त असलेल्या जागेवर आंतरजिल्हा बदलीने शिक्षकांच्या नियुक्ती करणार आहे,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०२-२०१९) :**(१) अंशत : खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचा दुसरा टप्पा राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी बैठक आयोजित करण्याबाबत

**(१४) १००५३६ (०४-०१-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी तसेच त्यांच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात तात्काळ बैठक आयोजित करण्याची सावंतवाडी तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेकडून गटविकास अधिका-यांना निवेदनाद्वारे मागणी केली असून संघटनेकडून करण्यात

आलेल्या मागण्यांची पूर्तता न केल्यास दिनांक ८ नोव्हेंबर,२०१७ रोजी पासून पंचायत समितीच्या कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे गटविकास अधिका-यांना देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच पदाधिका-यासोबत वर्षातून तीन बैठका आयोजित करण्याचे आदेश शासनाने दिले असतांनाही एकही बैठक घेतली नसल्याने कर्मचा-यांचे नुकसान होत आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी गट विकास अधिकारी , पंचायत समिती , सावंतवाडी यांच्या दालनात दि.९.११.२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या समस्यांच्या पूर्ततेसाठी दि.१४.११.२०१७ ते १५.११.२०१७ रोजी ग्रामपंचायत बांदा, कोलगाव, तळवडे , सांगेली येथे संयुक्त कँम्प आयोजित करण्यात आला. तसेच ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या समस्यांच्या पूर्ततेबाबत संबंधित ग्रामसेवकांना सूचना देऊन संबंधित ग्रामसेवकांकडून समस्यांची पूर्तता करून घेण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथील कन्यागत महापर्वासाठी दुसरा टप्प्यातील निधी देण्याबाबत

**(१५) १०१३८६ (२६-१२-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे गेले तेरा महिने सुरु असलेल्या कन्यागत महापर्वाची सांगता झाली तरी दुस-या टप्प्यातील निधी अद्यापपर्यंत दिलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरचा निधी तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :**(१) नाही.
(२) श्रीक्षेत्र नृसिंहवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील कन्यागत महापर्व सोहळ्यासाठी दि. २८.३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये, दुस-या टप्प्यातील रु. २७.५६कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून पहिल्या टप्प्यातील एकूण रु. ६५३०.१८ लक्ष व दुस-

या टप्प्यातील रु. १७०.०१ लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुणबी समाजाला ओ.बी.सी. प्रवर्गात समाविष्ट करण्याबाबत**

**(१६) १०२६९४ (०२-०१-२०१८). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुणबी समाज हा अत्यंत उपेक्षित व आर्थिक दृष्ट्या विपन्नावस्थेत जीवन जगत असल्यामुळे या समाजाचा समावेश शासनाने ओ.बी.सी. प्रवर्गात करावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ नोव्हेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०२-२०१९) :** (१) दिनांक ११.१२.२०१७ रोजीचे कुणबी स्वराज्य महासंघाचे निवेदन प्राप्त झाले हे खरे आहे.

(२) व (३) कुणबी समाज यांनी सादर केलेल्या निवेदनात ११ मागण्या संबंधित विभागास पाठवून त्यांचा अहवाल सादर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

---

**टेपवाडी व वडेरु (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ) येथील वडेरु तांबडपाल ते निवळी सीमा या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१७) १०२९२८ (२१-१२-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेपवाडी व वडेरु (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ) येथे अनेक वर्षापासून नादुरुस्त असलेल्या वडेरु तांबडपाल ते निवळी सीमा या २ किमीच्या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी मा. मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक बांधकाम व उपक्रम वगळून) यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१९) :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) प्रश्नांकित निवळी ते नायशी हद्द तांबटपाल चिंचवाडी शाखेसह रस्ता ग्रामीण मार्ग क्र.४५ असून या रस्त्याची एकूण लांबी ७.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते ४/५०० कि.मी. डांबरी पृष्ठभाग सुस्थितीत आहे. ४/५०० ते ६/५०० कि.मी. लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरण तसेच ६/५०० ते ७/०० कि.मी. लांबीतील डांबरीनुतनीकरण करणे आवश्यक असून जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रमाने या रस्त्याचे काम टप्प्या- टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील अनसीये येथील दुसगवाडी फाटा ते दलीतवस्तीचा सार्वजनिक रस्ता रहदारीसाठी खुला करण्याबाबत

**(१८) १०५२८२ (०७-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील अनसीये येथील दुसगवाडी फाटा ते दलीतवस्तीचा सार्वजनिक रस्तासाठी कै.नागलो दांडगो या व्यक्तिने स्व खुशीने बक्षीस पत्राद्वारे जमिन दिल्यानंतर ग्रामपंचायतीने सन २०११-२०१२ च्या शासनाचा निधी खर्च करून रस्ता निर्माण करण्यात आला आहे या रस्त्यावरून वाहतूक सुरू असताना सदरहू सार्वजनिक रस्त्यावर खड्डे मारून काटेरी कुंपण घालून दलित वस्तीतील ग्रामस्थांचा मार्ग दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजीपासून बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरहू रस्त्यावरील सर्व अतिक्रमण त्वरीत दूर करून विनाविलंब रस्ता रहदारीसाठी खुला करण्यात यावा म्हणून तेथील दलित वस्तीतील ग्रामस्थांनी तहसलिदार, सावंतवाडी यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार सदरहू रस्ता बंद करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह सदर रस्ता वाहतूकीसाठी पुर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही. तथापि, अशा आशयाचे निवेदन अनसिये ग्रामपंचायतीच्या काही ग्रामस्थांनी तहसीलदार, सावंतवाडी यांचेकडे दिनांक २/१/२०१८ च्या निवेदनान्वये केले होते.

(२) होय. हे खरे आहे.

(३) व (४) सदर अतिक्रमणाबाबत वस्तुस्थिती जाणण्यासाठी मंडल अधिकारी, बांदा यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून सदर रस्ता कोणीही अडविला नसल्याचा अहवाल मंडल

अधिकारी, बांदा यांनी दिला आहे. ग्रामपंचायत न.नं.२३ नुसार हरीजनवाडी दुगसवाडी रस्ता ते हरीजनवाडी पर्यंत जाणारी पायवाट अशी रस्त्याची नोंद आहे. सदर पायवाटीची लांबी ९० मीटर व रुंदी २ मीटर एवढी आहे. सद्य: स्थितीत सदर पायवाटेवर कोणत्याही प्रकाराचे कुंपण व खड्डे मारलेले नसल्याचे आढळून आले.

---

**महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघ (ता.बारामती,जि.पुणे) यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(१९) १०५४६९ (०७-०४-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघ (ता.बारामती,जि.पुणे) यांनी आपल्या विविध मागण्यांबाबतचे निवेदन शासनाला पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी निवेदनाद्वारे कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत,

(३) असल्यास,उक्त मागण्या मान्य करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :** (१) महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत संघटना, पुणे यांनी ६ मुद्दयांबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना दि. २२/६/२०१७ अन्वये निवेदन सादर केले आहे.

(२)

१) माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीतील ग्रामपंचायत कर्मचारी अनुदान रक्कम राज्य शासनाकडून मंजूर करून आणली आहे ही रक्कम आपले कार्यालयाकडून पंचायत समितीकडे वर्ग झाले असूनही संबंधित कर्मचा-यांना अनुदानाची रक्कम अनेकदा मागणी करूनही मिळाली नाही तरी त्वरित वाटप व्हावी.

२) जलसुरक्षा रक्षक मानधनाची रक्कम जिल्हा परिषद स्तरावरून पंचायत समितीकडे वर्ग झाले असून या मानधनाची रक्कम कर्मचा-यांच्या बँक खात्यावर जमा झालेले नाही तरी ती रक्कम जमा होवून कर्मचा-यांना मिळावी.

३) दि. १/७/२००७ पासून महागाईशी निगडीत राहणीमान भत्ता सुरू झालेला आहे अध्यापही काही ठिकाणी याची अजिबात अंमलबजावणी वारंवार मागणी करूनही अमलात आणली जात नाही. तरी सगळीकडे याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

४) जिल्हा परिषदेमध्ये १०% आरक्षण योजना लागू आहे कृपया यामध्ये १०% च्या ऐवजी यामध्ये वाढ करून २५% करण्यात यावी गतवर्षी जिल्हा परिषद सेवेमध्ये २३ कर्मचा-यांना मे

मध्ये सामावून घेतले होते. सध्या जुलै महिना उजाडला असूनही अध्यापही प्रक्रिया सुरू नाही. त्यामुळे, संबंधित पात्र कर्मचा-यांचे फार मोठे नुकसान होत आहे. तरी कृपया कमीत कमी १०% जागा भरून सर्व विभागामध्ये अनुशेष पुर्ण करण्यात येवून कर्मचा-यांना न्याय द्यावा.
५) गावची लोकसंख्या वाढत आहे व कामाचा ताणही कर्मचा-यांवर होत आहे. आकृती बंधाच्या बाहेरील कर्मचारी वर्षानुवर्षे सतत व नियमितपणे काम करीत असूनही यांना स्थायी पदावर सामावून घेण्यात येवून कर्मचारी आकृतीबंध वाढवावा व कर्मचा-यांना न्याय मिळावा.
६) कर्मचा-यांना शासनाच्या चतुर्थ वर्गाची वेतन श्रेणी अथवा नगरपालिका कर्मचा-यांप्रमाणे वेतन कायम स्वरूपी पेन्शन योजना, अपघात विमा योजना, कुटुंब विमा योजना लागू करण्याबाबत शासनाकडे चांगली शिफारस करावी.

(३) होय.

सदर निवेदनातील ६ मागण्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे -

१. माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीतील ग्रा.पं.कर्मचारी अनुदानाची रक्कम वाटप करणेत आली आहे.

२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांच्या दि. २३/२/२०१८ च्या अहवालानुसार जलसुरक्षा मानधनाची रक्कम सर्व पंचायत समितीकडे वर्ग केली आहे. याबाबतचे पंचायत समित्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

३. कामगार आयुक्त कार्यालय यांचे कडून वेळोवेळी दर सहामाही नंतर प्राप्त होणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विशेष भत्याच्या (राहणीमान भत्ता) निश्चित केलेल्या दरानुसार राहणीमान भत्ता अदा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्या कार्यालयाकडून वेळोवेळी जिल्हयातील सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच चालू आर्थिक वर्षातही राहणीमान भत्ता अदा करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

४. प्रत्येक भरतीवर्षी एकूण रिक्त पदांच्या जागांपैकी ग्रामपंचायतीमधील १०% पात्र कर्मचारी जिल्हा परिषदेमध्ये नियुक्त केले जातात. पुढील भरतीवर्षी देखील अशाप्रकारे जागा भरण्यात येतील.

५. व ६. ग्रामपंचायत कर्मचा-यांना नियमित कर्मचा-यांप्रमाणे वेतनश्रेणी देणेबाबत विचार करण्यासाठी व लोकसंख्या वाढीस अनुसरून आकृतीबंध सुधारण्याबाबत शिफारस करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम २०१६/ प्र. क्र. १७६/पंरा ३, दि. २/८/२०१७ अन्वये समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीने आपला अहवाल दिनांक ३१/०५/२०१८ च्या पत्रान्वये सादर केला आहे. सदर अहवाल तपासून त्यावर उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील संगणक परिचालकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(२०) १०६०८५ (०७-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील संगणक परिचालकांना गत सहा महिन्यापासून वेतन मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत सहा महिन्यापासून वेतन न मिळाल्यामुळे परिचालकांवर उपासमारीची वेळ आल्याने जोपर्यत वेतन होत नाही तोपर्यत नवीन कार्यप्रणाली आत्मसात करणार नसल्याचा इशारा परिचालक संघटनेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार परिचालकांच्या वेतन व अन्य मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय

(३) जुलै २०१७ ते डिसेंबर २०१७ या कालावधीत ज्या केंद्र चालकांना त्यांचा मोबदला मिळाला नाही, अशा केंद्र चालकांनी, काही अपवाद वगळता, देयक संगणक प्रणालीमध्ये त्यांनी केलेल्या कामाची पुष्टी न केल्यामुळे त्यांना मोबदल्याची रक्कम मिळाली नसल्याचे आढळून आले आहे. त्याअनुषंगाने देयक संगणक प्रणालीवर मोबदल्याची पुष्टी करणे संदर्भात सदर केंद्र चालकांचे विशेष प्रशिक्षण आयोजित करणेबाबतच्या सूचना सीएससी-एसपीव्हीला देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माजगांव (ता.पाटण,जि.सातारा) येथील ग्रामपंचायतीचे पदाधिकारी यांनी ग्रामपंचायती अंतर्गत विविध योजनांच्या निधीमध्ये केलेला गैरव्यवहार**

**(२१) १०८७८३ (०९-०४-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माजगांव (ता.पाटण,जि.सातारा) येथील ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायतीचे पदाधिकारी यांनी राष्ट्रीय पेयजल योजनेमधून पिण्याच्या पाण्याच्या योजनेच्या कामामध्ये तसेच या कामाकरीता जमा केलेली लोकवर्गणी तर ग्रामनिधीतून खरेदी केलेल्या एलईडी पथदिवे खरेदीमध्ये त्याचबरोबर घरकुल योजनेचे बनावट प्रस्ताव तयार करुन शासनाच्या निधीचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व अपहाराची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर कारवाई होणेबाबत दिनांक ३० मे, २०१७ रोजीच्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी एकमुखी ठराव घेवून तसेच यासंदर्भातील

लेखी तक्रार विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी,सातारा मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) जिल्हा परिषद सातारा यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावच्या ग्रामस्थांनी या अपहारासंदर्भात अनेकदा लेखी तक्रार करुनही सदरच्या अपहाराची चौकशी करण्यास अधिका-यांकडून टाळाटाळ केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,गटविकास अधिकारी,पंचायत समिती,पाटण यांनी दिनांक ०३ जुलै,२०१७ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) जिल्हा परिषद सातारा यांना दिलेला यासंदर्भातील अहवाल हा संदिग्ध असल्याचे संबधित ग्रामस्थांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

या योजनांच्या निधीमध्ये कोणत्याही प्रकारचा अपहार झालेला नाही.

(२) यासंदर्भात लेखी तक्रार प्राप्त झाली हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) होय,चौकशी केली आहे. तथापि, चौकशीमध्ये अपहार निदर्शनास आलेला नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बंजारा-भटके विमुक्त ओबीसी समाजाच्या मागण्यांवर निर्णय घेणेबाबत**

**(२२) १०९३९० (०७-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बंजारा-भटके विमुक्त ओबीसी समाजबांधवांनी मुंबईतील आझाद मैदानामध्ये दिनांक ५ जानेवारी,२०१८ रोजी मोर्चा काढून आंदोलन केले होते व यासंदर्भातील मागण्यांचे निवेदन शासनाकडे सादर केलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्यां पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०२-२०१९) :**(१) होय,
(२) व (३) राष्ट्रीय बंजारा क्रांतीदल यांचे दिनांक ५.१.२०१८ चे सादर केलेल्या निवेदनांत १८ मागण्या संबधित विभागास पाठवून त्यांचा अहवाल सादर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

---

**राज्यातील ग्राम परिवर्तन योजनेंतर्गत गावांचा विकास आराखडा तयार करण्याबाबत**

**(२३) ११०२१५ (०९-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्राम परिवर्तन योजनेंतर्गत सुमारे १ हजार गावांचा विकास आराखडा तयार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा आराखडा तयार केलेला असल्यास आराखड्याचे स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) महाराष्ट्रातील १००० गावांचे परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागात शाश्वत विकासासह ही गावे सक्षम बनण्याकरिता ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनमार्फत कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्यानुसार या गावांमध्ये गाव पातळीवर राबविण्यात येत असलेल्या सर्व शासकीय योजना एकत्रित करुन प्रत्येक गाव आदर्श गाव करण्याचा फाऊंडेशनचा उद्देश आहे. त्यानुसार निवड झालेल्या गावांचा गाव विकास आराखडा तयार करण्यात येत असुन त्या गावांमध्ये सर्व शासकीय योजनांचे एकत्रिकरण करुन त्या योजना राबविण्यात येत आहेत. त्याशिवाय गावांच्या विकासासाठी राज्यातील खाजगी आणि सार्वजनिक कंपन्या तसेच वित्तीय संस्था यांच्या कंपनी सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून त्यांचेही सहाय्य घेण्यात येत आहे.
पहिल्या व दूसऱ्या टप्प्यात ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानात १९ जिल्हयांतील ३५० ग्रामपंचायतीचा समावेश करण्यात आलेला असुन यापैकी ७०० गावांमध्ये ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानामार्फत कामे सुरु आहेत.
उर्वरित गावांमध्ये ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनमार्फत टप्प्याटप्प्याने सर्व शासकीय योजनांचे एकत्रिकरण करुन गाव विकास आराखडा तयार करुन अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकणंगले ग्रामपंचायतीच्या नुतन सदस्यांना अधिकार देण्याबाबत**

**(२४) ११०७०० (२८-०३-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले ग्रामपंचायतीची निवडणूक होवून लोकनियुक्त सरपंचासह चार सदस्य निवडून आले परंतु गणसंख्येपूर्तीअभावी नुतन सदस्यांना कोणतेही अधिकारी नाहीत तसेच प्रशासकीय अधिका-यांचे योग्य मार्गदर्शनाअभावी सर्व कारभार बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या ग्रामपंचायतीला अधिकार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) मौजे हातकणंगले ग्रामपंचायतीची मुदत दि.२९.११.२०१७ रोजी संपत असल्याने निवडणूक कार्यक्रम घोषित होवून दि. १६.१०.२०१७ रोजी निवडणूक घेण्यात आली. ग्रामपंचायत हातकणंगलेकरिता सरपंच १ व सदस्य १७ अशी एकुण १८ ची कार्यकारिणी होणे अपेक्षित होते. परंतु हातकणंगले येथील ग्रामस्थांनी हातकणंगले नगरपंचायत होणेकरिता ग्रामपंचायत निवडणूकीवर बहिष्कार टाकल्याने ज्या सदस्यांनी सरपंच १ व सदस्य ४ पदासाठी नामनिर्देशनपत्र भरली अशी एकुण ५ पदे निवडून आली व इतर रिक्त सदस्य पदाकरिता नामनिर्देशन पत्रे दाखल न केल्याने सदर निवडणूक प्रक्रियेमधून मौजे हातकणंगले या ग्रामपंचायतीची रचना कलम १० प्रमाणे पुर्ण झाली नाही व ग्रामपंचायत कार्यकारणी अस्तित्वात आली नाही. त्यामुळे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १५१ नुसार दि.१९.१.२०१८ रोजी प्रशासकाची नेमणूक करण्यात आली व सदरचे प्रशासकामार्फत ग्रामपंचायतीचे आवश्यक ते सर्व कामकाज कायदेशिररित्या योग्य मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

(२) माहे फेब्रुवारी २०१८ मधील रिक्त पदांच्या पोटनिवडणूकीच्या कार्यक्रमान्वये या ग्रामपंचायतीची निवडणूक दि.२७.०२.२०१८ रोजी घेण्यात आली असून त्यामध्ये सर्व रिक्त १३ सदस्यांची पदे भरण्यात आली असून कार्यकारणी मंडळ अस्तित्वात येऊन दि.१२.०३.२०१८ च्या पहिल्या सभेनंतर मौजे ग्रामपंचायतीचे कामकाज सुरळीत चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांसाठी स्वतंत्र राष्ट्रीय आयोग गठीत करण्याबाबत**

**(२५) ११३०९८ (२८-०३-२०१८). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष**

**मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिढयान्-पिढया भारतात राहणाऱ्या व १४ कोटी लोकसंख्या असलेल्या भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांसाठी स्वतंत्र राष्ट्रीय आयोग गठीत करण्याबाबतची शिफारस श्री भिकुजी इदाते यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या आयोगाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त आयोगाने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय व उक्त शिफारशी व्यतिरिक्त कोणकोणत्या शिफारशी आयोगाने आपल्या अहवालात केल्या आहेत,

(३) असल्यास, सदर अहवालातील शिफारशी शासनाने मान्य केल्या आहेत काय व अहवालातील शिफारशीची अंमलबजावणी केव्हापासून करण्यांत येणार आहे,

(४) असल्यास, अहवालातील शिफारशीची अंमलबजावणी तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०२-२०१९) :** (१),(२),(३),(४) व (५) भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांसाठी स्वतंत्र राष्ट्रीय आयोग गठीत करण्याची बाब ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे.

---

### राज्यातील कुलवंतवाणी या जातीचा समावेश इतर मागासप्रवर्गामध्ये करण्याबाबत

**(२६) ११५५९८ (०४-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुलवंतवाणी तसेच वैश्यवाणी ह्या जातीचा इतर मागासवर्ग प्रवर्गात अनुक्रमांक १९० वर १९८९ पासून असणारा समावेश हा विहित प्रक्रियेचा अवलंब न झाल्याने उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने दोन्ही जाती इतर मागास प्रवर्गातून वगळण्यात येवून पुन्हा नव्याने समावेश करण्यासाठी मागासवर्ग आयोगाकडून सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुलवंतवाणी आणि वैश्यवाणी अशा दोन्हींचे अहवाल शासनास प्राप्त होवूनही फक्त वैश्यवाणी या एकाच जातीचा समावेश इतर मागासवर्ग प्रवर्गात करण्यात आल्याने कुलवंतवाणी या जातीचा सुद्धा समावेश इतर मागासवर्ग प्रवर्गात पुन्हा करण्यात यावा अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ मार्च,२०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मागासवर्ग आयोगाकडून अहवाल क्र.४४ व ४५ नुसार वैश्यवाणी तसेच अहवाल क्र.४८ नुसार दोन्ही जातीचे अहवाल शिफारसीसह शासनास सादर केले असता दोन्ही जातीमधील फक्त वैश्यवाणी या जातीचा इतर मागासवर्ग यादी क्र.१९० मध्ये पुन्हा समावेश करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कुलवंतवाणी या

जातीचा इतर मागासवर्ग प्रजातीमधे पुन्हा नव्याने समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०२-२०१९) :**(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) राज्य मागासवर्ग आयोगाचा याबाबतचा अहवाल क्र.४८ शासनास प्राप्त झाला असून प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बहिणाबाईंच्या जन्मगावी उभारण्यात येणा-या बहिणाबाई स्मारकाबाबत

**(२७) ११८६६५ (२४-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जवळील असोदा या बहिणाबाईंच्या जन्मगावी उभारण्यात येणा-या बहिणाबाई स्मारकाचा विषय गेल्या १० वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त स्मारकाच्या मूळ आराखडयात बदल केल्याचे माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या स्मारकासाठी निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) होय, बहिणाबाई स्मारक बांधकामासाठी माहे मार्च-२०१८ पर्यंत रु.३१६.८० लक्ष तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु.७०.०० लक्ष एवढा निधी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दाभाडा (ता. धामणगाव रेल्वे , जि. अमरावती) येथील जिल्हा परिषदेतील शाळांच्या वर्ग खोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२८) ११८८६८ (३१-०७-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभाडा (ता. धामणगाव रेल्वे , जि. अमरावती) येथील जिल्हा परिषद शाळांच्या वर्ग खोल्याचे छतावरील टीनपत्रे एक वर्षापूर्वी वादळवाराने उडुन गेल्यामुळे तेव्हापासुन सदर वर्गखोल्यांची दुरुस्ती झाली नसल्याने सदर गावातील विद्यार्थ्यांना जिव धोक्यात घालुन शाळेत बसावे लागत असल्याचे दिनांक २ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वर्गखोल्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार वर्गखोल्यांची दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दोन वर्ग खोल्यांची टिन पत्रे उडून गेली असून केंद्र प्रमुख, गट शिक्षणाधिकारी/ उपशिक्षणाधिकारी यांनी नादुरुस्त खोल्यांची पंचायत समिती स्तरावरुन पाहणी केली असून सदरहू खोल्यांच्या दुरुस्ती ऐवजी निर्लेखन करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना बसण्याकरिता सुस्थितीत ४ खोल्या उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना जिव धोक्यात घालून वर्गात बसण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत सरपंच व सदस्य शौचालय वापरासंबंधीच्या ग्रामसभेचा ठराव अनिवार्य असल्याने शासन परिपत्रकात सुधारणा करण्याबाबत**

**(२९) १२०२५२ (३१-०७-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १६ च्या पोटकलम (१) च्या खंड (प) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १४ च्या पोटकलम (१) च्या खंड (ज-५) नुसार नवनिर्वाचित सरपंच वा सदस्य यांनी सार्वत्रिक निवडणुकामध्ये नामनिर्देक अर्ज भरतेवेळी ग्रामसभेमध्ये ठराव पारित करून शौचालय वापरा संबंधीचे प्रमाणपत्र सादर करणे शासनास बंधनकारक असल्याची तरतूद परिपत्रकात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतेक सरपंच व सदस्य यांना या परिपत्रकातील तरतुदीची कल्पना नसल्याने तसेच ग्रामसेवक, खंडविकास अधिकारी, जिल्हापरिषदेची यंत्रणेमार्फत प्रत्यक्षात नवनिर्वाचित सदस्याला माहिती न दिल्याने अनेकांनी ती प्रक्रिया केली नसल्याने जिल्हाधिकारी,अप्पर

जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तक्रारी दाखल करून सदर शासन परिपत्रकाच्या अधिनियमातील तरतुदीचा गैरवापर होत असल्याने अनेक सरपंच सदस्य यांना पदावरून दुर व्हावे लागत आहे त्यामुळे यात सुधारणा व्हावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीने मा. मुख्यमंत्री व मा. ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १९ मार्च,२०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९)** : (१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १६ च्या पोटकलम (१) च्या खंड (प) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १४ च्या पोटकलम (१) च्या खंड (ज-५) नुसार उमेदवारांनी सार्वत्रिक निवडणुकीमध्ये नामनिर्देशन अर्ज भरतेवेळी "ग्रामसभेमध्ये ठराव पारित करुन" शौचालय वापरासंबंधीचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत तरतुद होती.

तथापि, सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २५ दि.१५.०४.२०१७ अन्वये "ग्रामसभेच्या ठरावासोबत संबंधित पंचायतीचे प्रमाणपत्र" या मजकुरानंतर, "किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे किंवा त्याने पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, किंवा स्वयंप्रमाणपत्र" अशी सुधारणा करण्यात आली असून सदर सुधारणा ही दिनांक ३१ जानेवारी, २०१७ पासून अंमलात आली आहे. त्यामुळे शौचालय वापरासंबंधी ग्रामसभेचा ठराव बंधनकारक नाही.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदन दिले आहे हे खरे आहे.

शौचालय वापर प्रमाणपत्रासंबंधी वरील प्रमाणे सुधारणा संबंधित अधिनियमामध्ये करण्यात आली आहे. तसेच त्यापुर्वी दिनांक ७.१०.२०१६ रोजीच्या शासन पत्रान्वये निवडणूक लढवु इच्छिणाऱ्या उमेदवाराकडुन शौचालयाच्या प्रमाणपत्रासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जावर निर्णय घेण्यासाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्याबाबत तसेच अपवादात्मक परिस्थितीत ग्रामसभेचे आयोजन होवु शकले नाही तर अशा परिस्थितीत सहायक गट विकास अधिकारी यांनी ग्रामसेवकाच्या शिफारशीवरुन शौचालयाचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी, असे सर्व संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना निदेश देण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळापूर व पातुर (जि.अकोला) तालुक्यातील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांनी लक्षांकापेक्षा जास्त विहीरी मंजूर केल्याबाबत**

**(३०) १२१४७८ (२३-०७-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर व पातुर (जि.अकोला) तालुक्यातील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांनी लक्षांकापेक्षा जास्त विहीरी मंजूर केल्याचे माहे मे,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या तालुक्यातील लाभार्थ्यांना अनुदानाचा दुसरा हप्ता देण्यास संबंधित अधिकारी टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार लाभार्थ्यांना त्यांचे अनुदान तात्काळ वितरीत करण्यासह लाभार्थ्यांना अनुदानाचा दुसरा हप्ता देण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत चालू असलेल्या वैयक्तिक सिंचन विहिरींना गटविकास अधिकारी यांचेमार्फत नियमानुसार अनुदान वाटप करणे सुरू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण रस्ता क्रमांक २० कशेडी बंगला ते पळचिल रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(३१) १२४०१५ (३०-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण रस्ता क्रमांक २० कशेडी बंगला ते पळचिल रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,या विभागात पळचिल येथे प्राथमिक आरोग्य केद्र, माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा तसेच पळचिल,खडकणे, गोलदरा, मोरेवाडी, तामसडे, सावरीची वाडी गौळवाडी,जलाची वाडी, सातपानेवाडी आदि गावे व वाडी वस्तीवर जाण्यासाठी हा रस्ता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास,तदनुसार सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. प्रश्नांकित ग्रामीण मार्गाचा क्र. २० नसून ६३ असा आहे.
(३) सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.
(४) प्रश्नांकित रस्ता हा पोलादपूर तालुक्यातील इजिमा १६१ ते गोलदरा खडकवणे राममा क्र.६६ ला मिळणारा ग्रामीण मार्ग क्र.६३ असून या रस्त्याची एकूण लांबी ५.५० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.
सन २०१९-२० च्या PCI प्रमाणे या रस्त्याचा क्र. ०१ आहे.
जिल्हा परिषदेला ३०५४/५०५४ लेखाशिर्षांतर्गत प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून PCI प्राधान्यक्रमानुसार सदर रस्त्याचे काम करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानोरा तालुक्यातील (जि.वाशीम) आमगव्हाण ते कोंडोली रस्त्याचे डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(३२) १२४१९४ (३१-०७-२०१८). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमगव्हाण ते कोंडोली (ता.मानोरा,जि.वाशीम) रस्त्याचे डांबरीकरणाचे काम कंत्राटदारांनी एका रात्रीतून पूर्ण केले असून त्यामध्ये डांबर ऐवजी आईलचा अधिक वापर केल्यामुळे येत्या काही दिवसांत रस्ता नादुरुस्त होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामाची चौकशी करून कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यनुसार सदर रस्त्याचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) याबाबत लेखी मागणी जिल्हा परिषदेकडे प्राप्त नाही.
(३) रामा.आमगव्हाण ते कोडोली हा इजिमा ७० दर्जाचा रस्ता असून त्याची एकूण लांबी १२.५० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या साखळी क्र. ०/०० ते ०/४७५ मध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०१६-१७ अंतर्गत रु. ७.७८ लक्ष चे काम करण्यात आले आहे.

कार्यकारी अभियंता यांनी कामाची पाहणी केली आहे. सदर काम अंदाजपत्रकीय प्रावधानानुसार पूर्ण झालेले असून सदर रस्ता सुस्थितीत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील रस्त्याच्या दुरुस्तीकरिता निधी देण्याबाबत**

**(३३) १२४९८६ (३०-०७-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हयातील रस्त्यांची दुरवस्था दूर करून दुरुस्तीसाठी नाशिक जिल्हा परिषदेने दोनशे कोटी रुपयांची मागणी केली होती परंतु केवळ सव्वा दोन कोटी रुपये रस्त्याच्या दुरुस्तीकरिता मिळाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोनशे कोटी रुपयांची मागणीचा प्रस्ताव सादर केला असतानाही केवळ सव्वा दोन कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नाशिक जिल्हयातील रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी तात्काळ निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही. नाशिक जिल्हा परिषदेने दोनशे कोटी रुपयांची मागणी केलेली नाही. तथापि सन २०१७-१८ करीता रु. २०१३.८९ लक्ष इतका निधी लेखाशिर्ष ३०५४ २४१९ रस्ते व पुल दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील उजनी पुनर्वसित गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत**

**(३४) १२५१७७ (३०-०७-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील उजनी पुनर्वसित गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यात यावे अशी मागणी करमाळ्याच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ०१ ऑगस्ट,२०१७ रोजी वा त्यानुसार निवेदनाव्दारे मा.महसूल मंत्री व मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने उजनीच्या पाण्यामुळे गावांचे विभाजन

झाल्याने ग्रामपंचायत कार्यालय,पोस्ट ऑफिस,शाळा,बाजारपेठ, बँक आदींसाठी विदयार्थ्यांना बरेच अंतर प्रवास करावा लागत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुनर्वसित गावांना महसुली गावाचा दर्जा प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उजनी पुनर्वसित गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१९) :**(१), (२) व (३) मा. लोकप्रतिनिधींनी दिनांक २८.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये करमाळा तालुक्यातील वांगी २, ३, ४ व भिवरवाडी या गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठीचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

करमाळा तालुक्यातील उजनी पुनर्वसित २८ गावे असून त्यापैकी १७ गावांना ग्रामपंचायत स्थापन आहेत. उर्वरित ११ पुनर्वसित गावांपैकी ५ गावांना महसुली गावाचा दर्जा प्राप्त नसून २ गावांची मागणी नाही आणि वांगी २, ३, ४ व भिवरवाडी या ४ पुनर्वसित गावांची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठीची मागणी आहे.

(४) ग्रामपंचायत वांगी, ता. करमाळा या ग्रुप ग्रामपंचायतीमधून वांगी क्र. १,२,३,४ व भिवरवाडी या पाच स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचेमार्फत दिनांक १४.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला होता.

वांगी १, वांगी २, वांगी ३, वांगी ४ व भिवरवाडी या पुनर्वसित गावांचे पुनर्वसन हे मूळ वांगी ग्रामपंचायतीच्या हद्दीतच झालेले असल्याने सदरचा प्रस्ताव शासन निर्णय दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ व दिनांक ४ मार्च, २०१४ मधील निकषात बसत नाही.

त्यामुळे सदर प्रस्ताव शासनपत्र दिनांक २५ जानेवारी, २०१९ अन्वये विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांना परत पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील अणाव दाभाजीवाडी ते सुकळवाड (एम. आय. टी. एम. इंजिनिअरिंग कॉलेजकडे जाणाऱ्या) रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३५) १२६२७१ (३०-०७-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील अणाव दाभाजीवाडी ते सुकळवाड (एम. आय. टी. एम. इंजिनिअरिंग कॉलेजकडे जाणाऱ्या) रस्त्याची दुरवस्था झाल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची सरपंच,

ग्रामपंचायत अणाव व मा. राज्यमंत्री - सहकार यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १० एप्रिल,२०१८ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पत्रात केलेल्या मागणीच्या अनुषंगाने अणाव दाभाजीवाडी ते सुकळवाड या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) सदर मागणी या विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) प्रश्नांकित ओरोस जिल्हा मुख्यालय ते अणाव दाभाचीवाडी तलाव मार्गे रस्ता ग्रामीण मार्ग क्र. १२० हा ओरोस मुख्यालयातील विद्यार्थ्यांना कॅालेजकडे जाणारा जवळचा मार्ग असून सदर रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेला जिल्हा वार्षिक योजना/रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचे काम टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.
तसेच एम.आय.टी.एम. इंजिनिअरींग कॅालेज हे प्रजिमा क्र. ३८ च्या सा.क्र. ४/८०० मध्ये आहे. सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असून सुस्थितीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुनी पेंशन योजना पुर्ववत लागु करण्याबाबत

**(३६) १२६४२६ (०५-१२-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य जुनी पेंशन हक्क संघटन, पोलादपूर, जि. रायगड यांनी जुनी पेंशन मागणीसाठी दिनांक ५ सप्टेंबर,२०१८ रोजीच्या सुमारास काळया फिती लावून आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नवीन पेन्शन योजना लागू करण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने पूर्ण विचारांती घेतला असल्यामुळे जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत सद्यस्थितीत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही वा अपेक्षित नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करवाडी (जि.हिंगोली) गावात रुग्णांना रुग्णालयात घेऊन जाण्याकरीता वाहन उपलब्ध करुन देण्यासह नवीन रस्ते बांधण्याबाबत**

**(३७) १२६५५१ (१०-१२-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवाडी (जि.हिंगोली) गावातील एका अडीच वर्षाच्या मुलीची अचानक प्रकृती अस्वस्थ झाल्याने तीला उपचारासाठी रुग्णालयात घेऊन जाण्याकरीता वाहन नसल्याने व रस्ते खराब असल्याने तिच्या आईवडिलांना सहा किलोमीटर नांदापूर आरोग्य रुग्णालयात पायी चालत जावे लागल्याची घटना दिनांक २० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील अनेक ग्रामीण भागात पक्के रस्ते व रुग्णांना रुग्णालयात घेवून जाण्यासाठी वाहन नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व राज्यातील अनेक ग्रामीण भागासह करवाडी गावात रुग्णांना रुग्णालयात घेऊन जाण्याकरीता वाहन उपलब्ध करुन नवीन रस्ते बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) करवाडी हे गाव प्राथमिक आरोग्य केंद्र पोतरा,ता.कळमनुरी च्या कार्यक्षेत्रात आहे. येथे १०२ टोल फ्री ची रुग्ण वाहिका उपलब्ध आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय कळमनुरी येथे १०८ टोल फ्री ची रुग्णवाहिका उपलब्ध आहे.

करवाडी वस्तीस दोन रस्ते असून सदर रस्ते योजनाबाह्य आहेत.

१) हारवाडी ते करवाडी असा २.६०० कि.मी. लांबीचा रस्ता असून सदर लांबीपैकी सा.क्र. ०/०० ते २/२०० कि.मी. पर्यंत आदिवासी उपयोजनेंतर्गत काम करण्यात आले आहे. सा.क्र. २/२०० ते २/४०० कि.मी. पांदण आहे व सा.क्र. २/४०० ते २/६०० गायरान आहे.

२) नांदापूर ते करवाडी रस्त्याची लांबी ३.२०० कि.मी. आहे सदरचा संपूर्ण रस्ता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून करण्याचे प्रस्तावित असून एकूण लांबीपैकी पहिल्या १ कि.मी.अंतराच्या रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

सदरचे रस्ते योजनाबाह्य असल्याने शासनाच्या योजनेमधून सदरच्या रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन देता येत नाही.त्यामुळे सदर दोन्ही रस्त्यांचा समावेश रस्ते विकास आराखड्यामध्ये करण्यासाठी जिल्हा परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत लोकप्रतिनिधींनी सदरचे काम स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सूचविल्यास सदरचे काम करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

___

**कोयना जलविद्युत प्रकल्पाचे पाणी दुष्काळी भागात वळविण्याबाबत**

**(३८) १२६८४८ (०५-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना जलविद्युतचे पाणी दुष्काळी भागात वळविण्यासाठी उच्चस्तरीय अभ्यासगटाची जलसंपदा विभागाने नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभ्यासगटाने अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास,त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०२-२०१९) :** (१) होय,

दिनांक ०२/०८/२०१८ च्या शासन निर्णयान्वये अभ्यासगटाची नियुक्ती केली आहे.

(२) नाही.

सदर अभ्यासगटाचा अहवाल मे,२०१९ पर्यन्त शासनास सादर होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय, निमशासकीय शिक्षक-शिक्षकेत्तर व प्राध्यापक यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(३९) १२६९२६ (०५-१२-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक १ जानेवारी, २००६ ते १६ फेब्रुवारी,२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या शासकीय निमशासकीय शिक्षक-शिक्षकेत्तर प्राध्यापक या संवर्गातील कर्तचाऱ्याना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे ५० टक्के निवृत्ती वेतन व इतर लाभ द्यावेत असा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ११ ऑक्टोबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा शासन निर्णय लवकरच काढण्यात येईल असे लेखी पत्र सांगली जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन यांना देवूनही शासन निर्णय काढण्यात आलेला नसून दिनांक १ जानेवारी, २०१७ पासूनच्या महागाई भत्त्याचा फरक व दिनांक १ जानेवारी, २०१८ पासून सुधारीत महागाई भत्ता अद्यापही मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासकीय, निमशासकीय शिक्षक-शिक्षकेत्तर, प्राध्यापक यांच्या प्रलंबीत असलेल्या मागण्यांवर तात्काळ

निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०२-२०१९) :** (१) राज्यातील दिनांक १ जानेवारी २००६ ते २६ फेब्रुवारी, २००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे लाभ देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या दि.९.५.२०१४ च्या आदेशाविरुध्द शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका मा.न्यायालयाने दि.११.१०.२०१७ रोजी फेटाळली हे खरे आहे.
(२) व (३) कोषागारामार्फत निवृत्तिवेतन घेत असलेल्या निवृत्तिवेतनधारकांना दि.१.१.२०१७ पासूनचा महागाई भत्त्याचा व दि.१.१.२०१८ पासूनचा सुधारित महागाई भत्ता देण्यात आलेला आहे. राज्यातील दिनांक १ जानेवारी २००६ ते २६ फेब्रुवारी, २००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय दि.२७.१२.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ९७० आश्रमशाळांच्या गेल्या तीन वर्षातील कामकाजाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीबाबत**

**(४०) १२६९४४ (०४-१२-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विमुक्त जाती, भटक्या जमातींचे दोन लाख विद्यार्थी शिकत असलेल्या राज्यातील ९७० आश्रमशाळांच्या गेल्या तीन वर्षातील कामकाजाची चौकशी करण्यासाठी दिनांक ०३ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास सेवा निवृत्त्त उपायुक्त शोभा कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आश्रमशाळांमधील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदांना बिंदू नियमावलीप्रमाणे मिळालेल्या मान्यतेची चौकशी व वसंतराव नाईक महामंडळातील कर्ज प्रकरणांचीही चौकशी करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर समिती कोणकोणत्या मुद्यांवर चौकशी करुन किती कालावधीत अहवाल सादर करणार आहे व समितीच्या कामकाजासाठी येणारा खर्च वसंतराव नाईक महामंडळाकडून घेणार आहे काय,
(४) तसेच विमुक्त जाती भटक्या जमातीच्या आणखी नवीन आश्रमशाळा वाढत्या लोकसंख्येच्या आधारावर सुरु करणार आहे काय ?

**प्रा. राम शिंदे (०५-०२-२०१९) :** (१), (२) व (३) होय

(४) शासन निर्णय दि.३१ मे २००६ अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती विशेष मागासप्रवर्ग आणि उसतोड कामगारांच्या मुलांसाठी नविन प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा सुरु न करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून अद्यापही सदर निर्णय कायम आहे.

---

**वाडा (जि. पालघर) तालुक्यातील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(४१) १२७५३९ (१०-१२-२०१८). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि. पालघर) तालुक्यात जिल्हा परिषद बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोने-तुसे रस्ता, तुसे-कोयना वसाहत रस्ता, मोहोट्याचा पाडा- उसर रस्ता, मेट-घोणसई व तानसा फार्म रस्ता या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याची दिनांक २९ जुलै, २०१८ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व रस्त्याच्या कामाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार रस्त्यांच्या कामाची चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्यांचे कामे निकृष्ट दर्जाचे करणा-या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सदर रस्त्यांची पाहणी जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत करण्यात आली आहे. प्रश्नांकित कोने-तुसे व तुसे-कोयना वसाहत हा एकच रस्ता असून तो इतर जिल्हा मार्ग क्र.९१ असा आहे. या रस्त्याची एकूण लांबी ११.०० कि.मी.आहे. त्यापैकी सा.क्र. ०/३०० ते ००/७०० व ३/५०० ते ४/२६५ या लांबीचे खडीकरण व डांबरीकरण लेखाशिर्ष ५०५४ अंतर्गत मे २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

मेट घोणसई व तानसा फार्म हा इतर जिल्हा मार्ग क्र. ९५ असून या रस्त्याची एकूण लांबी ८.५० कि.मी. आहे. त्यापैकी सा.क्र०/०० ते ०/४५०, ६/०० ते ६/१२६ व ६/२५२ ते ६/५३२ या लांबीचे खडीकरण व डांबरीकरण लेखाशिर्ष ५०५४ अंतर्गत मे २०१८मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे, अवजड वाहतुकीमुळे, तसेच लोखंडी रिंग असलेल्या ट्रॅक्टरच्या वाहतुकीमुळे सदर रस्त्यांवर काही ठिकाणी खड्डे पडले आहेत. पावसाळ्याचा कालावधी हा निरिक्षण कालावधी असल्याने तसेच रस्ता सुस्थितीत केल्यानंतरच ठेकेदारास देयक अदा करण्यात येणार आहे.

तसेच मोहोट्याचापाडा-उसर या इतर जिल्हा मार्ग क्र.९५ या रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर आहे. सदर कामास अद्याप सुरुवात केलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांजरी ते चालबर्डी (ता.केळापूर,जि.यवतमाळ) रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४२) १२८२६१ (१०-१२-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांजरी ते चालबर्डी (ता.केळापूर,जि.यवतमाळ) रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असून त्याबाबत चौकशी करण्याबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक १, यवतमाळ यांनी उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पांढरकवडा यांना दिनांक ८ मार्च,२०१८ रोजी वा त्यासुमारास पत्र देऊन कार्यवाहीचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले होते, तथापि रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झालेले नाही.
(२) व (३) प्रश्नांकित रस्त्याच्या कामाबाबत लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कामाची तपासणी राज्य गुणवत्ता निरिक्षण यांच्या मार्फत करण्यात आली. सदर काम योग्य दर्जाचे आढळून आले असल्याने कंत्राटदार व अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा (जि.जळगांव) शहरातील विविध बँकांविषयी असलेल्या तक्रारीबाबत**

**(४३) १२९३४४ (०५-१२-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगांव) शहरातील विविध बँकाविषयी असलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रांतअधिकारी कार्यालयात माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधीच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बैठकीत कोणकोणत्या तक्रारी करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, या तक्रारी सोडविण्याकरिता कोणते निर्णय घेण्यात आले आहेत व त्यांचे स्वरुप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०२-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) या बैठकीत तालुक्यातील विविध बँकांमध्ये येणाऱ्या अडचणींबाबत तक्रारी करण्यात आल्या आहेत.
(३) प्राप्त तक्रारी सोडविण्याकरीता बैठकीस उपस्थित असलेल्या बँकेच्या मॅनेजर / प्रतिनिधी यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**भिवंडी ( जि.ठाणे ) तालुक्यातील अनगांव जवळील पिळंझे या गावच्या रस्त्यासह पूल वाहून गेल्याबाबत**

**(४४) १२९६८४ (१०-१२-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी ( जि.ठाणे ) तालुक्यातील अनगांव जवळील पिळंझे या गावच्या रस्त्यासह पूल वाहून गेल्याची घटना नुकतीच माहे जुलै,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पिळंझे गावच्या रस्त्याची चार महिन्यापूर्वीच नव्याने उभारणी केली असतांनाही यावर्षीच्या अतिवृष्टीमुळे रस्ता व पुलही वाहून गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्ता व पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार निकृष्ट दर्जाचे काम करणा-या कंत्राटदारांवर कारवाई करण्यासह रस्त्याची व पुलाची पुर्नबांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) अंशत खरे आहे.
(२) व (३) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली असून भिवंडी तालुक्यातील पिळंझे बेंदरपाडा नंबरपाडा भवरपाडा हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. १०० दर्जाचा असून या रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र. ०/०० ते १/६०० या पृष्ठभागाचे मजबुतीकरणाचे काम एम.एम.आर.डी.ए. बाह्य रस्ते सुधारणा अंतर्गत करण्यात आलेले होते.

तथापि, जुलै २०१८ मधील अतिवृष्टीत जुन्या अस्तित्वातील मोरीच्या ठिकाणी पाण्याच्या मोठ्या प्रवाहामुळे रस्त्याचा ७० मीटर लांबीचा पृष्ठभाग वाहुन गेलेला आहे. संबंधित ठेकेदाराने सदर कामाचा विमा काढलेला असल्यामुळे अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या रस्त्याची दुरुस्ती ही विमा रक्कमेतून संबंधित ठेकेदाराकडून करुन घेण्यात येत आहे.

सदरचा रस्ता अतिवृष्टीमुळे वाहून गेला असल्याने तसेच अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या रस्त्याची दुरुस्ती विमा रक्कमेतून संबंधित ठेकेदाराकडून करुन घेण्यात येत असल्याने ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृष्णा खो-यातील पाणी पुर्वेकडील कृष्णा आणि भीमा खो-यातील दुष्काळी भागाकडे वळविण्यासाठी स्थापन केलेल्या अभ्यासगटाच्या अहवालाबाबत**

**(४५) १३०७२० (०६-१२-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना जलविदयुत प्रकल्प व टाटा जलविदयुत प्रकल्प समुहातुन वीज निर्मितीसाठी कृष्णा खो-यातील पाणी पुर्वेकडील कृष्णा आणि भीमा खो-यातील दुष्काळी भागाकडे वळविण्यासाठी जलसंपदा विभागाचे निवृत्त सचिव श्री. अ.पा. भावे यांच्या अध्यक्षेतेखाली अभ्यासगटाची दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजी नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभ्यास गटाच्या कार्यकक्षा कोणेकोणत्या आहेत व अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०२-२०१९) :** (१) होय,

(२) अ) सदर अभ्यास गटाच्या कार्यकक्षा पुढील प्रमाणे आहेत.

१. टाटा जलविद्युत प्रकल्पासाठी मागील ९० वर्षापासून मुळशी व इतर धरणातून भीमा उपखोऱ्यातील दरवर्षी अंदाजे ४२.५० TMC पाणी पश्चिमेकडे वीजनिर्मितीसाठी वळविण्यात येते. उर्ध्व भीमा हे तुटीचे उपखोरे असून बहुतांश भाग हा दुष्काळग्रस्त आहे. तसेच सिंचन, शहरीकरणामुळे पिण्याचे पाणी व औद्योगिक क्षेत्राकरिता उर्ध्व भीमा उपखोऱ्यात पाण्याची खूप मोठी मागणी आहे. त्यानुसार टाटा जलविद्युत प्रकल्पाकरिता पश्चिमेकडे वीज निर्मितीसाठी वळविण्यात येणारे पाणी टप्प्याटप्प्याने कमी करून पूर्वेकडे मूळ उर्ध्व भीमा उपखोऱ्यातच वळविण्याकरीता वर्षनिहाय टप्पे ठरविणे.

२.सद्य:स्थितीत पश्चिमेकडे वीजनिर्मितीसाठी वळविण्यात येणारे पाणी टप्प्याटप्प्याने कमी करतांना वीजनिर्मितीसाठी सध्याची निर्माण केलेली व्यवस्था इष्टतम कार्यक्षमतेने उपयोगात आणण्यासाठी त्यामध्ये कराव्या लागणाऱ्या बदलांबाबत उपाययोजना सुचविणे (उदा. पारंपरिक वीज निर्मिती केंद्राऐवजी उदंचन योजनेत रुपांतरण करणे), जेणेकरून पाण्याचा अत्यल्प वापर होऊन काही प्रमाणात वीज निर्मिती करणे शक्य होईल.

३. कोयना व टाटा कंपनीच्या जलविद्युत प्रकल्पांच्या अवजलाचा प्रस्थापित वापर कोकणात सिंचन, पिण्याकरीता व औद्योगिक क्षेत्रासाठी करण्यात येतो. अशा परिस्थितीत पाणी बंद केल्यास सदर भागाकरिता पाणी उपलब्ध होणार नाही. याअनुषंगाने सध्या वापरात येणाऱ्या पाण्यासाठी कोकणातील जलस्त्रोतांचा विकास करण्याबाबत उपाययोजना सुचविणे.

४. प्रथम कृष्णा पाणी तंटा लवाद १ च्या निवाडयानुसार कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा १, २ व ४ मधून वीज निर्मिती करून ६७.५० अघफू पाणी पश्चिमेकडे वळविण्यात येते. त्यामुळे सदर पाणी सिंचन व पिण्याच्या पाण्याच्या गरजेकरिता टप्प्याटप्प्याने कमी करून इतर उपखोऱ्यामध्ये वळविण्यास बंधन असणार नाही. त्याकरिता पूर्वेकडील सिंचन, पिण्याचे पाणी व औद्योगिक क्षेत्राच्या मागणीच्या अनुषंगाने उपरोक्त मुद्या क्र. २ व ३ स्वतंत्रपणे या प्रकल्पासाठी सुध्दा अभ्यास करून अहवाल सादर करणे.

५. सदर प्रस्तावामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य कायदेविषयक बाबींचा परामर्श घेवून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीची दिशा व टप्पे सुचविणे.

ब) सदर अभ्यास गटाचा अहवाल मे, २०१९ पर्यन्त प्राप्त होणे अपेक्षीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील महाविद्यालये ओ.बी.सी एस.सी.एस. विद्यार्थ्यांकडून शिक्षण परिक्षा व इतर शुल्क आकारत असल्याबाबत**

**(४६) १३११४८ (०४-१२-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील महाविद्यालयांना शिष्यावृत्तीच्या माध्यमातुन ओ.बी.सी एस.सी.एस. विद्यार्थ्यांना शिक्षण परीक्षा आणि इतर शुल्क शासनाकडून देण्यात येत असतांनाही अनेक महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून उक्त शुल्क आकारून विद्यार्थ्यांची लुट करीत असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट,२०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार विद्यार्थ्यांची लुट करणाऱ्या महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०१-२०१९) :** (१) नाही .

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यात सातत्याने निर्माण होणाऱ्या पाण्याच्या बिकट समस्येवर कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी नेमण्यात आलेल्या अभ्यास गटाच्या अहवालाबाबत**

**(४७) १३१४९७ (०७-१२-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात सातत्याने निर्माण होणाऱ्या पाण्याच्या बिकट समस्येवर कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी मराठवाडा प्रदेशास इतर भागाच्या नदीखोऱ्यातील पाणी वळविण्यासाठी प्रस्तावित नदीवळण योजनेचा अहवाल तयार करण्यासाठी खानदेशातील जळगावच्या तापी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट शासनाने माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान नेमला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अभ्यासगटाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अभ्यास गटाच्या अहवालात नमूद केल्या शिफारसीं कोणत्या आहेत,

(४) असल्यास, सदरहू शिफारसींची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०२-२०१९) :** (१) मराठवाडा किंवा इतर तुटीच्या खोऱ्यात विपुलतेच्या खोऱ्यातून पाणी वळविण्यासाठी प्रवाही वळण योजना तसेच उपसा वळण योजनांचे (नदी जोड प्रकल्प) नियोजन करण्यात येत आहे. सदर योजना निधी उपलब्धतेनुसार टप्प्या टप्प्याने घेण्यासाठी सदर योजनांचे प्राधान्यक्रम ठरविणे व या वळण योजनांचे मापदंड निश्चित करण्यासाठी कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांच्या अध्यक्षतेखाली व प्रत्येक महामंडळातून प्रत्येकी एक मुख्य अभियंता घेऊन शासन निर्णय दि.१३/०८/२०१८ व शुध्दीपत्रक दि.१२/१०/२०१८ अन्वये एक अभ्यासगट गठित करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) सदर अभ्यास गटाचा कार्यकाळ दि.१५/०९/२०१८ पर्यंत होता. तथापि, अहवाल तयार करण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या अभ्यासगटाच्या कामाची व्याप्ती जास्त असल्यामुळे तसेच सदर अहवाल परिणामकारकरित्या तयार करण्यासाठी शासन निर्णय दि.१२/१०/२०१८ अन्वये अभ्यासगटास दि.३१/१२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अद्याप अभ्यासगटाकडून अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोखाडा, विक्रमगड, जव्हार व डहाणू (जि. पालघर) या तालुक्यात घरकुल योजनेत झालेला गैरव्यवहार

**(४८) १३२०३१ (१०-१२-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्थिकदृष्टया दुर्बल, दारिद्र रेषेखालील कुटुंबाना घरकुल योजनेअंतर्गत केंद्र शासनाने घरकुल योजना कार्यान्वित केली असून मोखाडा, विक्रमगड, जव्हार व डहाणू (जि. पालघर) या ठिकाणी या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अनेक गैरव्यवहार होवून घरकुलासाठी आलेले पैसे हे ग्रामसेवक व सरपंच यांच्या संयुक्त खात्यात बँकेत जमा होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य सरकारी कर्मचा-यांना लागू करण्यात आलेले परिभाषित**
**अंशदान निवृत्तीवेतन योजनेबाबत**

**(४९) १३२१०८ (०४-१२-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारी कर्मचा-यांना लागू करण्यात आलेले परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेवर माहे नोव्हेंबर, २०१५ नंतर अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंशदान परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनामध्ये जमा न करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जव्हार (जि.पालघर) तालुक्यात रोजंदारीसाठी होत असलेले मजुरांचे स्थलांतर**

**(५०) १३३४८८ (३०-११-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यात बेरोजगारी वाढल्याने त्या परिसरातील आदिवासी स्थलांतरीत करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास,त्यानुसार मजुरांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०३-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.